MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात




आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील सुलेमान देवळा ते अंभोरा फाटा म्हसोबा वाडी फाटा ते सावरगाव या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून प्रवास करने कठीण झाले आहे.दोन्ही रस्त्यांवर शेकडो खड्डे पडले असून काही ठिकाणी रस्त्यावर खड्डे आहेत की खड्डयात रस्ता आहे हेच कळणे अवघड झाले आहे. अधिक माहिती अशी की, अंभोरा येथे पोलिस ठाणे असल्याने व सुलेमान देवळा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने या ठिकाणी परिसरातील नागरिकांची सारखी वर्दळ असते.तसेच सावरगाव मायंबा येथे देव दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची नेहमी गर्दी असते. या रस्त्यांवरून दुचाकी व चारचाकीने प्रवास करने म्हणजे चालक आणि प्रवाशांची कसोटीच.या ख़राब रस्त्यांमुळे अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे.गेली कित्येक दिवसांपासून प्रवाशांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.लाखों रुपयांचा निधी येऊन सुद्धा दुरुस्ती होत नसेल तर हा पैसा जातो तरी कुठे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.संबंधित विभागाने या कडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर हे दोन्ही रस्ते दुरुस्त करावे,अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -८६ | गुरूवार दि.१२ डिसेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -86 | THURSDAY DT.12 DECEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

# बीड जिल्ह्यामधील माफीयाना धडा शिकवायचा असेल तर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे तपास यंत्रणा देणे गरजेचे

## केज पोलीस ठाणे नव्हे तर बीड जिल्ह्यातील सर्वच पोलीस ठाणे गुन्हेगारी माफीयांचे बांधिल झाले?








बीड/ प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यामध्ये माफीया राज बोकाळल्यानंतर आता बीड जिल्ह्यामध्ये खून दरोडा अपहरण बिहार पेक्षा जास्त परिस्थिती लाजवेल अशी चित्र स्पष्ट झाल्यानंतर मात्र आता एक खणके अधिकारी ची खरच बीड जिल्हा पोलीस प्रशासनाला आहे आणि संबंधित अपहरण खंडणी व कुणाच्या गुन्ह्याचा तपास जर करायचा असेल तर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे तपास यंत्रणा देणे काळाची गरज आहे. कारण अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकरांकडे परळीचा अपहरण सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनाचा तपास करण्यासाठी गृह विभागाने परवानगी द्यावी व त्या पूर्ण टीमचे नेतृत्व करण्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे संबंधित तपास देण्यात यावा सचिन पांडकर हे कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत**

**एस पी अविनाश बारगळ हे पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना सुद्धा कळले नाहीत तर जनतेला काय कळणार?**

- **खून दरोडा हाणामाऱ्या बीड जिल्ह्यातील जनता पिक्चर पेक्षा डोळ्याने जास्त रस्त्यावर पाहू लागली?**
- **बीड जिल्हा पोलीस माफीयाच्या दावणीला बांधला गेला?**
- **परळीचा अपहरण केज चा मस्साजोग येथील सरपंचाची हत्या. कोणाच्या इशाऱ्यावर झाली- सुरेश धस**
- **संदीप क्षीरसागर, सुरेश धस, अंबादास दानवे, आक्रमक मयत सरपंचाच्या परिवाराची घेतली भेट शेवटच्या श्वासापर्यंत लढा देणार.**

या अगोदर सुद्धा त्यांनी अनेक गुन्ह्यामध्ये गुन्हेगारांना धडा शिकवला व सत्य परिस्थिती बाहेर काढून पीडितांना न्याय देण्याचे काम सचिन पांडकर यांनी केलेले आहे त्याच दरम्यान आता ची बीडची परिस्थिती पाहिली तर माफिया भोकाला आहे बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ हे काहीच कामाचे नाहीत त्यापेक्षा नंदकुमार ठाकूर यांचे कार्य चांगले होते असे बीडची जनता सांगत असतानाच मात्र आता चांगला अधिकारी म्हणून जर कोणाकडे बोट दाखवले जात असेल तर तो चांगला अधिकारी म्हणजे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब हाच आहे असे बीड जिल्ह्यातील जनतेची मागणी होत आहे बीडच्या जनतेने या अगोदर सुद्धा बीड शहरांमध्ये पेड बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मनोरुग्न मुलीवरती बलात्कार झाला होता अल्पवयीन मुलीवरती बलात्कार झालेल्या आरोपींना सोडून दिल्यानंतर सायन दैनिक सायं महाराष्ट्र आरंभ मध्ये बातम्या प्रसिद्ध नंतर बीडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी तपास यंत्रणा हाती घेतली त्यानंतर त्यांनी योग्य पद्धतीने तपास पूर्ण करून त्यामध्ये तीन आरोपी निष्पन्न केले त्यानंतर पेठ पोलीस ठाण्यामध्ये मनोरुग्ण अल्पवयीन दलित समाजाच्या मुलीवर बलात्कार झाल्याच्या नंतर त्या परिवाराला व त्या मुलीला न्याय देण्याचे काम सचिन पांडकर यांनी केलेले आहे म्हणून सचिन पांडकर हे एक कर्तव्यदक्ष व काळजीवाहू अधिकारी आहेत सचिन पांडकर यांच्याकडे मयत सरपंच संतोष देशमुख व परळी येथील दुबेनामक व्यापाऱ्याचे अपहरण झाले होते परळीतील आपण मोठे मोठे गुन्ह्याचे तपास हे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे देणे काळाची गरज आहे बीडमध्ये अनेक कारवाया करत असताना सचिन पांडकर यांचे कार्य मोलाचे राहिलेले आहे बीडमध्ये शस्त्र बाळगणारे गुटखा माफिया मटका पत्त्याचे कलम यासह वेगवेगळ्या कारवायांमध्ये सचिन पांडकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे त्यांनी नियोजनबद्ध कार्यक्रम करत गुन्हेगारांना मुसक्या दाबण्याचे काम सचिन पांडकर यांनी केलेले आहे. म्हणून एकदा बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी जर कुठे थांबायचे असेल तर सचिन पांडकर सारखे अधिकाऱ्याला गृहमंत्री तथा नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी सचिन पांडकर यांना आदेशित करणे गरजेचे आहे. अविनाश बारगळ यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा पोलीस प्रशासनातील सर्व पोलीस स्टेशनचे हप्ते खोरे चालत आहे या हप्ते खोलीमध्ये अनेक दिग्गज पोलीस अधिकारी आपापल्या पद्धतीने परळीला मोठे पॅकेट देऊन संबंधित पोलीस स्टेशन घेत आहेत यामध्ये तुम्ही मात्र शंका नाही परंतु यामध्ये आता पोलीस अधीक्षक अविनाश बारगड यांच्याकडून अनेक पोलीस स्टेशन बारगाळे आहेत अशीही चर्चा नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे. केस पोलीस स्टेशनला बीड जिल्ह्यातील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये साधी एनसी दाखल करायला गेलेल्या माणसाला हाकलून दिले जात असल्यामुळे संबंधित माफी या भोकाला आहे.




## मस्साजोग प्रकरणात शासन-प्रशासनाने न्याय द्यावा- आ.संदीप क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी):- पवनचक्की धारकांकडून बीड जिल्ह्यात अनेक बेकायदेशीर गैरप्रकार होत आहेत. पवनचक्की संदर्भाने शेतकरी व नागरिक यांना धमकावणे, गुंडगिरी, फसवणूक झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. यातच पवनचक्कीच्याच संदर्भातील प्रकरणातून केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच असलेले स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाली आहे. या प्रकरणात शासन आणि प्रशासनाने स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना संरक्षण आरोपींना तात्काळ अटक करून कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



बीड विधानसभा क्षेत्रासह संपूर्ण बीड जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून पवनचक्की कंपन्या कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या पवनचक्की कंपन्यांच्या मालक व हस्तकांकडून ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना धमकावणे, फसवणे, मारहाण करणे, जमिनी बळकावणे, पवनचक्की चे काम करताना शेतातील पिकांचे नुकसान करणे असे अनेक प्रकार मागील काळात घडले आहेत. यासोबतच पवनचक्कीच्या कामात शेतकऱ्यांची जमिनीचे हस्तांतरण झाल्यानंतर शेतकऱ्यांना ठरलेल्या रकमेप्रमाणे देयके न देणे असेही गैरप्रकार पवनचक्की कंपन्यांकडून व त्यांच्या हस्तकांकडून घडलेले आहेत. आता तर या लोकांची थेट हत्या करण्यापर्यंत मजल गेली आहे. केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाल्याचा प्रकार सोमवार (दि.९) रोजी बीड जिल्ह्यात घडला आहे. हा प्रकार म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचे अक्षरश: वाभाडे काढल्यासारखा आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कडक कायदेशीर कारवाई करावी. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रातील चौसाळा, नेकनूर, लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील बहुतांश गावात देखील पवनचक्की मालक व त्यांच्या हस्तकांकडून वारंवार असे प्रकार घडले आहेत. त्यातून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. पवनचक्की संदर्भाने बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था संदर्भाने मोठा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत शासन आणि प्रशासनाने योग्य पाऊले घेऊन कारवाई करावी. यासोबतच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी निष्पक्ष पवित्रा घ्यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यासंदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण चे महासंचालक, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चऱ्हाटा येथे थेट

# शेतकऱ्यांशी संवाद साधून प्रश्नांचे केले निराकरण

बुधवार दिनांक ११ डिसेंबर रोजी चऱ्हाटा मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामकाजांचा आढावा घेण्यात आला . या बैठकीला मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी ( ग्राम महसूल अधिकारी ) , ग्रामसेवक , कृषी सहायक , बीएलओ , पोलीस पाटील , स्वस्त धान्य दुकानदार तसेच अंगणवाडी सेविका इत्यादी उपस्थित होते . सर्वप्रथम सर्व गावकरी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्यातर्फे चंद्रकांत शेळके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला व त्यानंतर बैठकीस सुरुवात झाली. सुरुवातीलाच तहसीलदारांनी सांगून टाकले की तुमचे प्रश्न तुम्ही बिनधास्तपणे माझ्यासमोर मांडा . ही कसली बैठक आहे म्हणून ताण तणाव न घेता अगदी गप्पा मारत मारत आपण सगळ्यांचे प्रश्न जाणून घेऊ व त्यांना सक्षमपणे सोडवू .

सर्वसामान्य लोकांच्या अडचणी जाणून घेऊन , त्यांची प्रलंबित कामे याबद्दल सविस्तर चर्चा करून त्यावर तात्काळ कार्यवाही करावी , अशा सूचना संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या . गावकऱ्यांनीही आपले प्रश्न गावासंबंधी असो किंवा वैयक्तिक असो बेधडकपणे प्रश्न मांडले आणि तहसीलदारांनी त्यांचे यथोचित समाधान केले . यातुन त्यांची कार्यतत्परता आणि लोकांविषयी असलेला कनवाळूपणा दिसून येतो . त्यानंतर कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक , कृषी सहाय्यक यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांपर्यंत योजना लवकरात लवकर पोहोचवाव्यात त्या पारदर्शक असाव्यात , वेळोवेळी गावांना भेटी द्याव्यात व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात , शेतकऱ्यांची कामे तात्काळपणे पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी दिल्या . तदनंतर उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला . ग्रामपंचायत अधिकारी यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत तसेच त्यांना सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत .त्यांची सर्व कामे वेळेवर पूर्ण केली पाहिजेत. अशाही सूचना दिल्या . चऱ्हाटा मंडळातील स्मशानभूमीचा प्रश्न लोकांनी त्यांच्यासमोर मांडला . त्यानुसार ' गाव तेथे स्मशानभूमी ' अंतर्गत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी गावकऱ्यांना लवकरात लवकर जमीन उपलब्ध करून त्यांचा स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल , असे आश्वासन दिले . त्यानंतर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा प्रत्यक्ष दुकानात जाऊन , स्थळ पाहणी करून घेण्यात आला . एकही पात्र लाभार्थी रेशन मिळण्यापासून वंचित राहू नये




अशा फक्त सूचना सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना शेळके यांनी दिल्या .

यानंतर उपस्थित असलेले सर्व बीएलओ यांना नवीन नाव नोंदणी संदर्भात सूचना दिल्या . उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी सजग असतात . ग्राउंड लेव्हल ला जाऊन सर्वांचे प्रश्न जाणून घ्या , असे त्यांचे म्हणणे असते . बैठकीत पुढे बोलताना प्रामुख्याने अनुदानापासून कोणीही पात्र शेतकरी वंचित राहू नये , तसेच सलोखा योजनेचा प्रचार , प्रसार , प्रसिद्धीकरणावर भर द्यावा , असे यावेळी तहसीलदारांनी सांगितले . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले .

देशाचं भवितव्य आणि देशाचा विकास हा सध्याच्या तरुण व युवा पिढीवर अवलंबून आहे . जर त्यांना योग्य ते शिक्षण व मार्गदर्शन मिळाले तर सुदृढ पिढी सुदृढ देशाची निर्मिती करते . या जाणिवेने तहसीलदार यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चऱ्हाटा येथे सदिच्छा भेट दिली . तेथील विद्यार्थ्यांची प्रगती , त्यांचा हजेरीपट तसेच शाळेचे वातावरण यांची पाहणी केली . शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती परदेशी यांनी सत्कार करून शाळेबद्दल माहिती दिली . शाळेची आत्तापर्यंतची प्रगती व भविष्यातील त्यांचे असलेले उद्दिष्ट तहसीलदारांसमोर मांडले . शाळेत दिला जाणारा पूरक आहार , योग्य शिक्षण व त्यांची कौतुकास्पद असलेली उपस्थिती याबद्दल तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्टाफ व विद्यार्थ्यांचे कौतुक केले .

तहसीलदार शेळके यांनी ग्रामीण भागात स्वतः येऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या, याबद्दल सर्वसामान्य जनतेने समाधान व्यक्त केले . यावेळी चऱ्हाटा मंडळाचे मंडळ अधिकारी श्री एम एच जायभाये , चऱ्हाटा व भाळवणी सजेच्या ग्राम महसूल अधिकारी अश्विनी डोळस, पालवन सजेचे ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण आगलावे , पिंपळवाडी सजेच्या ग्राम महसूल अधिकारी कुमारी माधुरी आर्दड , मंजरी हवेली सजेचे ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड , मंडळातील कृषी सहाय्यक , पोलीस पाटील व ग्रामसेवक इत्यादी उपस्थित होते .

बैठक संपन्न झाल्यावर तहसीलदार शेळके यांनी चऱ्हाटा येथील शेतकरी अरविंद देवराव उबाळे , गट नंबर ५ मधील रब्बी ई पीक पाहणी नोंदणीचे प्रात्यक्षिक करून दाखवले . तसेच पिकाची पाहणी केली . सर्वांनी लवकरात लवकर ई पीक पाहणी मोबाईल पद्धारे करावी असेही त्यांनी आवाहन केले . यावेळी अधिकची माहिती देताना शेळके म्हणाले की ई पीक पाहणीचा जो कालावधी आहे त्याच्या वेळापत्रकामध्ये थोडासा बदल करण्यात आलेला आहे . नोव्हेंबर पासून सुरू होणारी पिक पाहणी आता १ डिसेंबर पासून सुरू करण्यात आली आहे .१डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना आपल्या रब्बीच्या पिकांची पाहणी करता येणार आहे . त्यानंतर १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये सहाय्यक स्तरावरील ई पीक पाहणी केली जाणार आहे . शेतकऱ्यांच्या माध्यमातून ही पीक पाहणी करत असताना डीसीएस पच्या माध्यमातून ही पिक पाहणी केली जाणार आहे . ती करत असताना तंतोतंत जिओ फेन्सिंगच्या माध्यमातून होणार असल्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या गटांमध्ये उभे राहूनच ईपीक पाहणी करावी लागणार आहे .अशा प्रकारची इफेक्ट पाहणी केल्यानंतर त्यातील १०% पाहणी ही ग्राम महसुल अधिकारी यांच्या माध्यमातून तपासली जाणार आहे, असे नमूद केले .

ग्रामीण भागात सर्वसामान्य जनतेत मिसळून त्यांच्याशी संवाद साधणारा , त्यांच्या समस्या जाणून घेणारा , सोबतच विविध विभागाचे अधिकारी , कर्मचारी यांना घेऊन फिरणारा तहसीलदार दर्जाचा अधिकारी बीड जिल्ह्याने किंबहुना पहिल्यांदाच बघितला असावा . अशा प्रकारे जनतेशी थेट संवाद असल्यास निश्चितच त्यांच्या अडचणींचे निराकरण होईल आणि प्रशासन वेगवान होईल यात शंका नसावी.

# गेवराईत गोदावरी नदीपात्रांना लागले हप्तेखोरीचे ग्रहण; वाळू उपसा काय थांबेना!

## पोलीस अधीक्षक साहेब, गेवराईचे हप्तेखोर डिवायएसपी नीरज राजगुरू यांना पाठिशी घालू नका? अशा भ्रष्ट आणि हप्तेखोर अधिकाऱ्याची उचलबांगडी करून त्याजागी दुसरा खमक्या अधिकारी द्या!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी नदीपात्रात वाळू माफियांकडून दिवस-रात्र अवैधरीत्या वाळू उपसा करून त्याची चोरटी वाहतूक सुरू आहे. मात्र याबाबत गेवराई चे डिवायएसपी नीरज राजगुरू यांना काय पाझर फुटेना, अशा हप्तेखोर डिवायएसपी राजगुरू यांची जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी उचलबांगडी करून तात्काळ बदली करावी , अशी मागणी सर्व सामान्यांकडून होत आहे. गेवराई तालुक्यात वाळू माफियांना आळा घालण्यासाठी खमक्या अधिकाऱ्याची गरज आहे. मात्र सध्याचे डिवायएसपी नीरज राजगुरू हे अवैधरीत्या आणि बेसुमार वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांना आळा घालण्यात अपयश ठरत असून, उलट वाळू माफियांकडून हप्ता गोळा करून वाळू माफियांना पाठिशी घालत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. यामुळे अशा भ्रष्ट आणि हप्तेखोर अधिकाऱ्याची तात्काळ बदली करून त्यांच्याजागी खमक्या आणि सिंघम अधिकाऱ्याची नेमणूक करावी, जेणेकरून गोदामातेला लागलेले हप्तेखोरीचे ग्रहण निघेल, वाळू माफियांवरील पोलिस प्रशासनाच्या हप्तेखोरीमुळे वचक कमी झाल्याने अवैध वाळू उपशाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळेच बिनदिकपणे दिवसाढवळ्या वाळू उपसा करून त्याची चोरी केली जात आहे. पोलीस प्रशासनाच्या साफ दुर्लक्ष असल्यानेच वाळू उपसा सुरु असल्याचा आरोप गोदाकाठच्या ग्रामस्थांकडून केला जात आहे. वाळू उपशातून लक्षाधीश झालेल्या वाळू माफियांनी गेवराई तालुक्यात प्रचंड दहशत निर्माण केली आहे. हप्तेखोर डिवायएसपी नीरज राजगुरू यांच्या कर्मचाऱ्यांसोबत असलेल्या अर्थपूर्ण संबंधांमुळे आर्थिक तडजोडीमुळे वाळू माफियां विरोधात बोलण्याचे








धाडस कोणी करीत नाही. नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशामुळेच ही परिस्थिती उदभवल्याचा सूर उमटत आहे. गोदापात्रातून होणाऱ्या बेसुमार अवैध वाळू उपशाकडे पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षाने शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. वाळू माफिया सुसाट झाले असून या अवैध धंद्यात सर्वात अधिक जोर धरलेली वाळू उपसा रोखण्यात डिवायएसपी नीरज राजगुरू यांची यांना अद्याप यश आलेले नाही. पोलीस प्रशासन, महसूल प्रशासनाचे पथक कारवाईसाठी येणार असल्याची माहिती या वाळू माफियांना कशी मिळते. तसेच कायदा-सुव्यवस्था मोडीत काढण्याचे धाडस वाळू माफियांकडे कुठून येते? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. अवैधरीत्या आणि बेसुमार वाळू उपसा सुरू असताना वाळू माफियांवर डिवायएसपी नीरज राजगुरू हे दयाळू झाले आहेत. वाळू माफियांसोबत साटेलोटे व मधून संबंध असल्यामुळे आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे बोलले जात आहे. डिवायएसपी नीरज राजगुरू यांच्या नाकावर टिच्चून वाळू माफिया वाळूची वाहतूक सुसाट करत आहे. त्यामुळे नदीपात्रात मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यात एखादी मोठी घटना घडली तर या घटनेचा जबाबदार कोण? अशी चर्चा होत आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देउन वाळू माफियांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे



## निसर्गाची किमया न्यारी पपईत वसविले पक्षी भारी

बीड (प्रतिनिधी) - आज एका फळांच्या गाड्यावर पपई विक्रीस आली होती. त्यात एका पपई चे आकार असे होते, जसे दोन पक्षी एकमेकांच्या पाठमोरे बसले आहेत. या पपईचे छायाचित्र टिपले मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी.



स्व. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त पहाडी पारगाव ग्रामपंचायतच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप करताना उपसरपंच हनुमंत बप्पा मुंडे, तसेच शालेय समितीचे अधयक्ष बंडु भाऊ मुंडे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर जी साखरे सर माजी सरपंच बंडूभाऊ मस्के उपाध्यक्ष बाळकृष्ण अंडिल, सेवा सोसायटीचे संचालक आसाराम गुरुजी मुंडे सेवा सोसायटीचे माजी संचालक गणेश बप्पा अंडील, ग्रामपंचायत सदस्य माणिक मस्के उध्दव रुद्रे,मच्छिंद्र पूर्णे, नवनाथ इरमले भागवत मुंडे पांडुरंग चव्हाण संदिपान अंडील शंकर मुंडे व शिक्षक/शिक्षिका उपस्थित मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी गावातील नागरिक

# प्रीतीसुधाजी शैक्षणिक संकुलात गीता पठण

**राहता/प्रतिनिधी**

**अध्यात्मिक क्षेत्रातून आदर्श जीवन मूल्यांचा संदेश देणारा पवित्र ग्रंथ श्रीमद्भगवद्गीता जयंती निमित्त राहता येथील प्रीतीसुधाजी शैक्षणिक संकुलात सुमारे २००० विद्यार्थ्यांनी एकाच वेळेस गीतेतील श्लोकांचे पठण करून गीता जयंती साजरी केली भगवद्गीता अभ्यासिका गीताप्रिय शलाका गांधी, शंतनू गांधी,प्राचार्य ज्ञानेश डांगे,अध्यक्षा स्नेह लता डांगे, संचालिका पूनम डांगे, कार्याध्यक्ष भगवान डांगे, शोभा डांगे,शिवाजी देवढे, स्वाती धनवटे यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्यास होती.**




गीता प्रिय शलाका गांधी(वृषाली सुलाखे) यांच्या सुमधुर वाणीतून बालकांनी साथ संगत देत गीतेतील निवडक श्लोकांचे पठण केले, आपल्या जीवनातील भगवद्गीतेचे महत्व आणि कर्माचा त्याग नाही तर त्याग भावाने कर्म करण्याची प्रेरणा भगवद्गीतेत आहे अशी माहिती सौ. गांधी यांनी अतिशय सुंदर प्रकारे दिली.

प्राचार्य ज्ञानेश डांगे म्हणाले, कुरुक्षेत्रावर भगवान श्रीकृष्ण यांनी अर्जुनाला गीता सांगितली. त्यातील श्लोक हे सर्व विश्वातील प्रश्नांची उत्तरे मिळवून देणारी आहेत. संस्थेचे कार्याध्यक्ष भगवान डांगे यांनी आपल्या जीवनातील अनुभव कथन करून स्व. इंद्रभान डांगे तुमच्या आठवणींना उजाळा दिला, या सोहळ्यासाठी प्रीती स्कूलच्या नर्सरीतील बालगोपालांनी राधाकृष्ण व महाभारतातील विविध पात्रांची मनमोहक वेशभूषा परिधान केली होती त्यांना आकर्षक बक्षसे देण्यात आली,सूत्रसंचालन प्रा. सचिन गिते व अशोक गाढवे यांनी केले. हा सोहळा यशस्वीतेसाठी स्कूल मधील शिक्षकांनी मेहनत घेतली.

# साहेब तुम्ही आज असायला हवे होते.....

बरे झाले तुम्ही सुटलात एकदाचे....ग्रामीण भागातल्या सर्वसामान्य माणसांच्या जगण्याचा जीवनाचा आधारस्तंभ म्हणजे गोपीनाथ मुंडे एका सामान्य कुटुंबातील एक छोटासा मुलगा आपल्या कर्तुत्वाने नेतृत्वाने व दातृत्वाने एका विशिष्ट उंचीवर जातो आणि स्वतःचे नाव कमावतोय कॉलेजच्या जीवनामध्ये आपल्याला व्यासपीठावर उभारून भाषण करता आले नाही याची सल मनात ठेवून राज्यातल्या सगळ्यात मोठ्या नेत्यांमध्ये स्वतःचा समावेश झाल्यानंतर स्वतःच्या शब्दफेकीमुळे संपूर्ण राज्यातल्या माणसांच्या मनावर गारुड निर्माण करणारा हा लोकनेता म्हणजे गोपीनाथ मुंडे बारा कोटीच्या महाराष्ट्रामध्ये १२ पक्षांमध्ये बारा वेगळ्या प्रकारच्या माणसाबरोबर अत्यंत प्रामाणिक मैत्रि निभावणारा १२ डिसेंबरला जन्माला आलेला अत्यंत सच्चा दिलाचा मित्र म्हणजे गोपीनाथ मुंडे विधानसभेची निवडणूक हरल्यानंतर जिल्हा परिषदेचा सर्वात जास्त मताने निवडून आलेला सदस्य म्हणजे गोपीनाथ मुंडे भारतीय जनता पार्टीची स्थापना झाल्यानंतर १९८० च्या विधानसभेत भाजपाच्या पहिल्या पाच आमदारात निवडून गेलेला भाजपाचा संस्थापक आमदार असलेला नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे वसंतराव भागवता सारखा ज्याला गुरु भेटला आणि त्या गुरुचा विश्वास ज्यांनी सार्थकी ठरवला असा शिष्य म्हणजे गोपीनाथ मुंडे भाजपाचे संस्थापक अध्यक्ष उत्तमराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सामाजिक समीकरण बनवताना जो निर्णय घेतला त्या निर्णयांमध्ये धनगरांचा अण्णा डांगे माळ्या चा ना स फरांदे मराठ्यांचा सूर्यभान वाढणे वंजारी बंजारी समाजाचा नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे या सर्वांना बरोबर घेऊन केलेला पहिला प्रयोग त्या प्रयोगाचा शिल्पकार म्हणजे गोपीनाथ मुंडे १९८५ च्या विधानसभेत पराभव झाल्यानंतर भारतीय जनता पार्टीने ज्यांच्यावर पक्ष वाढवण्याची जबाबदारी दिली आणि ती जबाबदारी ज्याने यशस्वी करून दाखवली तो प्रदेशाचा अध्यक्ष म्हणजे गोपीनाथ मुंडे १९९० च्या विधानसभेच्या निवडणुकीत पुन्हा विजयाला प्राप्त करून महाराष्ट्राच्या विधानसभेत गेल्यानंतर तत्कालीन सरकारला सळो कि पळो करून सोडणारा गटनेता म्हणजे गोपीनाथ मुंडे सुधाकर नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजधानीत म्हणजे मुंबईत बॉम्बस्फोट झाल्यानंतर नागपूर मध्ये गवारी समाजाचे झालेले हत्याकांड बाबरीच्या पतनानंतर झालेली देशातली सगळी दंगल मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरामध्ये मराठवाड्यात झालेला रक्तपात या सर्वच घटनेत सरकारला आलेले अपयश आणि त्या अपयशाला झोडून काढणारा महाराष्ट्रातला सर्वात जास्त भागात जाऊन महाराष्ट्रातल्या जनतेमध्ये सरकारच्या विरोधात रान पेटवणारा विरोधी पक्ष नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे दाऊद सारख्या देशद्रोह्याला फरफटत आणण्याची घोषणा करून एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडून टाकेल अशी घोषणा करून महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनात परिवर्तनाची लाट निर्माण करून राज्यात सत्ता परिवर्तन करणारा एकमेव नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे राज्यात सत्तांतर झाल्यानंतर जनतेचे संरक्षण करणाऱ्या पोलिसांचा खरा मित्र आणि पोलिसांचे मनोबल वाढवणारा देशातला सर्वात यशस्वी गृहमंत्री म्हणजे गोपीनाथ मुंडे महाराष्ट्रातल्या शेती क्षेत्राला लागणारी वीज शेतकऱ्यांना सरसकट मोफत देऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली करण्यास हातभार लावणारा यशस्वी ऊर्जामंत्री म्हणजे गोपीनाथ मुंडे महाराष्ट्राचे तत्कालीन अर्थमंत्री हसू आडवाणी यांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडून महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात ऐतिहासिक भूमिका घेणारा व सर्व समाजातल्या पोरांना नोकरी देण्यासाठी वेळप्रसंगी कायदा बदलणारा अर्थमंत्री म्हणजे गोपीनाथ मुंडे महादेव शिवणकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पाटबंधारे मंत्रीपदाचा कारभार हातात घेऊन महाराष्ट्राच्या व विशेषतः मराठवाड्यातल्या प्रत्येक दर्या खोऱ्यातून वाहणाऱ्या नदीला अडवून पाण्याची नियोजन करून मोठे साठवण तलाव व शक्य तिथे बंधारे उभे करून मराठवाड्याचे व विशेष करून बीड जिल्ह्याचे सिंचन वाढवणारा सिंचन मंत्री म्हणजे गोपीनाथ मुंडे मनोहर जोशी प्रदेशात गेल्यानंतर त्यांच्या जागी मुख्यमंत्रीपदाचा काही दिवसांसाठी कारभार हातात घेऊन महाराष्ट्रातल्या सगळ्या खात्यामध्ये आपल्या स्वतःच्या विचारांची माणसे बसून पाहिजे तसे शिक्षण व बांधकाम खात्यामध्ये आपल्याला हवी असणारी गोष्ट करून घेण्यासाठी सरकारचा व सत्तेचा वापर करणारा एकमेव नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे पोलीस खात्यामध्ये सर्व धर्मातल्या पोलिसांना त्यांच्या धर्माच्या आचरणाप्रमाणे काम करण्याची संधी देण्यासाठी वेळप्रसंगी स्वतःच्या खात्यामध्ये कायद्याचा बदल करून त्यांना त्यांच्या जीवनमानामध्ये बदल घडवून आणण्याची शिफारस करणारा गृहमंत्री तथा जिल्ह्याचा पालकमंत्री कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे गोपीनाथ मुंडे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये स्वतंत्रपणे उर्दू विभागाची स्थापना करून त्या विभागाला भरघोस निधी उभा करून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणारा या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणजे गोपीनाथ मुंडे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल एज्युकेशन या संस्थेच्या वेगवेगळ्या विषयातल्या शिक्षण घेणाऱ्या पोरांच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता वस्तीगृहाची व संस्थेच्या इमारतीची उभारणी करण्यासाठी सरकारच्या वतीने पाच कोटी रुपये उपलब्ध करून देणारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वाहक म्हणजे गोपीनाथ मुंडे जैन धर्माचे संस्थापक भगवान महावीर व मुस्लिम धर्माचा अत्यंत पवित्र असणारा बकरीईद हा सण एकाच वेळेस येत असतो या सणामुळे महाराष्ट्रामध्ये दरवर्षी सामाजिक तणाव निर्माण होत आलेला होता मात्र या तणावाला दूर करण्यासाठी सकाळी भगवान महावीरांची पूजा संपल्यानंतर दुपारनंतर मुस्लिम समाजाने बकरी ईद साजरी करावी यासाठी सरकारच्या वतीने पुढाकार घेऊन यशस्वी तोडगा काढणारा सरकाराचा धर्मनिरपेक्ष प्रतिनिधी म्हणजे गोपीनाथ मुंडे भारतातल्या मुस्लिमांना हज यात्रेसाठी जाताना त्यांना सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून यात्रेच्या भाड्यामध्ये जास्तीत जास्त सवलत




मिळवून देण्यासाठी सरकारच्या वतीने सबसिडी उभी करून देण्यात केंद्र सरकारकडे प्रतिनिधित्व करणारा एक सर्व धर्मीय माणूस म्हणजे गोपीनाथ मुंडे हज यात्रेला जाणाऱ्या व मुंबईतून प्रवास करणाऱ्या प्रत्येक माणसाची सोय व्हावी म्हणून त्यांच्यासाठी मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणात हज हाऊस बांधून त्यांची व्यवस्था करणारा एक व्यवस्थापकीय नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे विद्यार्थी दसेपासून राजकारणात व समाजकारणात काम करताना त्यांना मदत करणाऱ्या सर्व मित्रांना व त्यांच्या सहकार्यांना सरकारमध्ये सामील होता यावे म्हणून सरकारमध्ये असलेल्या वेगवेगळ्या महामंडळात व समित्यांमध्ये त्यांना स्वतंत्रपणे काम करण्याची संधी देणारा कुटुंबप्रमुख भूमिपुत्र म्हणजे गोपीनाथ मुंडे जातीपातीच्या व धर्म धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ माणुसकी व विचारावर काम करणारा प्रतिगामी विचाराच्या पक्षात राहून पुरोगामी धोरण राबवणारा एक कर्मयोगी पुरुष म्हणजे गोपीनाथ मुंडे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढ्यामध्ये पक्षाची भूमिका विरोधात असताना सुद्धा स्वतः मात्र बाबासाहेबांच्या विचारांची भूमिका घेऊन जेलमध्ये जाऊन राहणारा एक विद्यार्थी प्रिय नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे देशाच्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर देशात आलेल्या एकमेव पहिल्या आणीबाणीत स्वतःच्या नेतृत्वावर विश्वास ठेवण्यासाठी १८ महिने जेलमध्ये गेलेला मात्र आणीबाणी या विषयावर कधीच चुकीचे मत न व्यक्त केलेला वास्तववादी नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे आपल्या स्वतःच्या कुटुंबापेक्षाही आपल्या जिल्ह्यातल्या व आपल्या भागातल्या माणसावर जीवापाड प्रेम करणारा एक मोठा माणूस म्हणजे गोपीनाथ मुंडे बीड जिल्ह्यातल्या अनेक परिवारांचे राजकारण संपले होते अशा परिवारांना हात देऊन त्यांचे राजकारण पुन्हा जिवंत करणारा त्याचबरोबर राज्यातल्याही अनेक मोठ्या परिवारांचे राजकारण संपल्यात जमा होते तरीसुद्धा अशा लोकांना मान सन्मानाने पदावर बसवणारा मोठ्या मनाचा मोठा माणूस म्हणजे गोपीनाथ मुंडे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वंशाचा यशस्वी विचार पुढे घेऊन जाणाऱ्या उदयसिंह राजे भोसले या राजपुत्राला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री करणारा एकमेव नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे शंकरराव मोहिते पाटील यांच्या दुसऱ्या पिढीतल्या पोरांना राजकारणात संधी मिळत नसताना सोलापूरच्या खासदार पदी विराजमान करणारा राष्ट्रीय नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे राजकारणात व समाजकारणात गोपीनाथ मुंडे यांना ज्यांनी ज्यांनी मदत केलेली आहे त्या मदतीचा आदर ठेवून त्या परिवाराला कायमस्वरूपी आपल्याबरोबर ठेवण्यात यशस्वी झालेला महाराष्ट्राच्या राजकारणातील एकमेव धुरंधर नेता म्हणजे गोपीनाथ मुंडे चाळीस वर्षाच्या राजकीय कारकीर्दीमध्ये फक्त पाच वर्षे सत्तेत आलेला मात्र २५ वर्षे सत्तेत आहे असंच वागणारा राजासारखं मन व मनासारखा राजा हे वैभव उपभोगणारा राज वैभवी बलदंड लोकनायक म्हणजे गोपीनाथ मुंडे भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतली गुंडांची फौज पोलिसांच्या गोळीने तोडून फोडून टाकणारा व त्यासाठी पोलिसांना वाटेल ती मदत करणारा गुणडांचा कर्दन काळ ठरलेला माणूस म्हणजे गोपीनाथ मुंडे अशी कितीतरी विशिष्ट नावे गोपीनाथ मुंडे यांच्या पाठीमागे लावता येऊ शकतात मात्र गोपीनाथ मुंडे यांनी कधीही आपण केलेल्या कामाचा लोकांमध्ये उदोउदो केलेला नाही अत्यंत संघर्ष वाटायला आल्यानंतर या माणसाने कधीही त्या संघर्षाची जाहीरपणे चर्चा केलेली नाही ज्या लोकांना त्यांनी जवळ केले त्यांना पदावर बसवले त्या लोकांनी त्यांना अनेक वेळा धोका दिला मात्र त्या लोकांबद्दल सुद्धा त्यांनी कधी त्यांच्या मनामध्ये वाईट विचार आलेला नाही ज्या लोकांची गोपीनाथ मुंडे च्या राजकारणात कोणतीही पात्रता नव्हती अशा अनेक लोकांना गोपीनाथ मुंडेंनी पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदापासून ते थेट राज्याच्या राजकारणामध्ये मंत्री खासदार किंबहुना केंद्रात मंत्री केलेले आपणास पाहावयास मिळेल मात्र असे अनेक लोक आहेत की त्यांनी पदे भोगली तिथे पाहिजे ते मिळवले आणि शेवटी गोपीनाथ मुंडे यांनाच दोष देत त्यांचा पक्ष सोडला आपल्याला व आपल्या पक्षाला सोडून गेलेल्या कोणत्याही जिल्ह्यातल्या अथवा राज्यातल्या कोणत्याही नेत्याला त्यांनी कधीच जाणीवपूर्वक त्रास दिला असे आत्तापर्यंत तरी वाटत नाही उलट पक्षी स्वतःच्या पक्षांमध्ये अत्यंत लहान असलेली काही लोक गोपीनाथ मुंडे यांच्या पेक्षाही पदांनी मोठे झाले मात्र त्यांच्याबद्दलही त्यांच्या मनात कधीही वाईट विचार आलेला नाही गोपीनाथ मुंडे यांनी राजकारणामध्ये कोणत्याही जातीच्या धर्माच्या माणसाला कोणत्याही पद्धतीने त्याचा छळ होईल अशी वागणूक दिलेली नाही समाजात व राजकारणात काम करताना अनेक गोष्टीला अनेक त्रासाला आपल्याला सामोरे जावे लागते त्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी होता आज त्रास देणारा माणूस आज आपल्या बरोबर नसला तरी कधी काही त्याची आपल्याला मदत होऊ शकते त्यासाठी कधीही कोणताही कायमस्वरूपी शत्रू अथवा मित्र ठेवायचा नाही अशी त्यांची भावना होती त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे माजी आमदार विनायकराव मेटे हे आपल्याला सांगता येईल अनेक वेळा त्यांच्यात टोकाचे मतभेद झाले मात्र त्या दोघांची मैत्री ही शेवटपर्यंत टिकून राहिली व त्यांच्या शेवटच्या लोकसभेच्या निवडणुकीत विनायक मेटे यांनी सुद्धा त्यांना मदत केली बीड जिल्ह्याच्या राजकारणातील त्यांना मदत करणारे सर्वात मोठे कुटुंब म्हणजे जयदत्त क्षीरसागर बीड जिल्ह्याच्या माजी खासदार तथा गोपीनाथ मुंडे वर आईसारखे प्रेम असलेल्या केशरबाई काकू शिरसागर यांनी त्यांना प्रचंड मदत केलेली होती त्यांनीही त्यांना अनेक वेळा मदत केलेली आहे अनेक वेळा त्यांच्यात मतभेद झाले मात्र त्या दोघांनी कधीही स्वतःच्या मनात अंतर पडू दिला नाही आज बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये पुन्हा या दोन्ही परिवाराला एकत्र येण्याशिवाय पर्याय राहिलेला दिसत नाही गोपीनाथ मुंडे यांचा परिवार फुटल्यानंतर जयदत्त क्षीरसागर ज्या ताकतीने गोपीनाथ मुंडे यांच्या पाठीशी उभे राहिले होते त्याची परतफेड करण्याची संधी या विधानसभेच्या निवडणुकीत धनंजय मुंडे यांना मिळाली होती त्यांनीही त्याचे सोने करत शिरसागरांचा व त्यांचा असलेला अंतर कमी केला जयदत्त क्षीरसागर यांचे घर जेव्हा फुटले ते घर फोडण्यात धनंजय मुंडे यांचा वाटा आहे अशी चर्चा केली जात होती मात्र विधानसभेच्या निवडणुकीत या फूटलेल्या दोन्ही घरांना एकत्रित आणण्यात धनंजय मुंडे यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली व त्यांनी आपल्यावर असलेला हा कलंक आपल्या स्वतःच्या कामातून पुसून काढला विशेष म्हणजे या त्यांच्या पूर्ण प्रक्रियेचा घटक होण्याची संधी मला एक छोटा कार्यकर्ता म्हणून दादासाहेब मुंडे यांना संधी भेटली याचा मला मनस्वी आनंद आहे गोपीनाथ मुंडे साहेब यांच्याबरोबर काम करण्याची मला तब्बल वीस वर्षे संधी भेटली त्यांच्यामुळे मला राजकारणात अनेक गोष्टी शिकायला भेटल्या गोपीनाथ मुंडे यांच्या जवळ आलेला माणूस कधीच त्यांना सोडून गेलेला नाही त्याचे रहस्य कशात आहे ही गोष्ट मला त्यांच्यामुळे शिकायला भेटली त्यामुळे आपल्या संपर्कात आलेला माणूस त्याच्या स्वतःच्या वागण्यामुळे आपल्यापासून दूर जाऊ शकतो मात्र आपल्या वागण्यामुळे तो दूर जाणार नाही याची कला गोपीनाथ मुंडेंनीच आम्हाला शिकवली गोपीनाथ मुंडे यांचा राजकीय सामाजिक वसा व वारसा चालवण्याची कला कारणात विध्वंसक व तिच्या लोकांना हद्दपार करण्यात यश येऊ शकेल कारण अशा लोकांनी बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये अस्थिरता निर्माण केलेली आहे जातीपातीच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेली अस्थिरता आपल्याला विकासाच्या कामात अडथळा ठरू शकते आणि म्हणून आपण सगळ्यांनी एकत्रित येऊन जाणीवपूर्वक जाती-धर्माचे राजकारण करणाऱ्या लोकांना बाजूला केले पाहिजे व जातीपातीचे विष लोकांच्या आणि विशेषता युवकांच्या मनामध्ये जे पेरले जात आहे त्याला थांबवण्याची गरज निर्माण झालेली आहे १२ डिसेंबर १९४९ ला जन्म घेतलेल्या गोपीनाथराव मुंडे यांचे आज खरं म्हणजे बीड जिल्ह्याच्या राजकारणाला जगणे किती महत्त्वपूर्ण होते हे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही जर गोपीनाथ मुंडे जिवंत असते तर असा विचार जरी केला तरी आपल्याला एक गोष्ट निश्चित समजली असती की जर मुंडे साहेब जिवंत असते तर आत्ता मराठवाड्यात विशेषता बीड जिल्ह्यात जी स्थिती निर्माण झाली आहे ती कदापी झालेली नसती हे नक्की मुंडे साहेबांनी बीड जिल्ह्याच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये कधीही विष पेरण्याचे काम केलेले नाही आरक्षणाच्या विषयामध्ये त्यांनी आपली स्वतंत्रपणे भूमिका मांडली होती ज्या भूमिकेला बीड जिल्ह्यातल्याच नव्हे तर मराठवाड्यातल्या सर्व जाती धर्मातल्या लोकांचा पाठिंबा होता कदाचित ते असते तर आज आपल्याला या विषयावरून हे सगळे वादळ पाहण्याची वेळ आली नसती अनेक शिकलेल्या व बुद्धिवान लोकांना बीड जिल्ह्यामध्ये सध्या जे घडत आहे त्याची चीड आलेले आहे मात्र धन दांडग्या व जात दांडग्या लोकांना नेमकी कोणी बोलायचे हा प्रश्न निर्माण झालेला आहे सर्व जाती धर्मातल्या लोकांना काहीतरी सांगायचे आहे मात्र आपण जर बोलायला गेलो आणि ते सत्य आहे त्यामुळे समोरच्या लोकांना राग आल्याशिवाय राहणार नाही त्यापेक्षा न बोललेले बरे असे समजून बरेच लोक बोलत नाहीत या सर्व गोष्टीचा विचार करता साहेब तुम्ही या सर्व गोष्टीतून सुटलात मात्र तुम्ही आज असायला हवे होते तुम्ही आज नाहीत या गोष्टीची खंत आम्हाला कायमस्वरूपी राहणार आहे तुमच्या जाण्यामुळे आम्ही जे भोगत आहोत त्याची कल्पना सुद्धा करवत नाही भविष्याच्या गर्भात नक्की काय वाढून ठेवले आहे हे आम्हाला माहीत नाही मात्र तुमच्या जयंतीच्या निमित्ताने आम्ही एवढीच इच्छा व्यक्त करत आहोत की आम्हाला संत श्रेष्ठ भगवान बाबांनी सुबुद्धी द्यावी आणि ज्या जिल्ह्यांनी तुमच्या आचाराचा विचाराचा व सर्व दृष्टीने राजकारणाचा आनंद घेतलेला आहे त्याच पद्धतीचा विचार आमच्या मनामध्ये निर्माण व्हावा व जाती धर्माच्या पलीकडे जाऊन आरक्षण आणि इतर ज्या गोष्टीचा विषय माणसांमध्ये दुरावा निर्माण करीत आहे अशा सर्व विषयांमध्ये काहीतरी मध्यम मार्ग निघावा जेणेकरून हे सर्व विषय संपून जातील व बीड जिल्ह्यात जो निर्माण झालेला जातिवाद व युवक कार्यकर्त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेला सर्व संशय कल्लोळ संपून जावा हीच तुमच्या जयंतीच्या निमित्ताने तुम्हाला आदरांजली ठरेल.... साहेब तुम्ही आज असायला हवे होते मात्र तुम्ही आज नाहीत तरीसुद्धा मनात तुम्ही कुठेतरी जवळच आहात आणि हे सर्व पहात आहात तुम्हाला कधीतरी वाटेल की तुम्ही स्वतःच या सर्व लोकांना कुठल्यातरी मार्गाने आवाहन कराल आणि हा सर्व बीड जिल्ह्यात निर्माण झालेला पेच प्रसंग तुमच्याच हाकेने संपून जाईल हे मात्र निश्चित...दादासाहेब मुंडे ९४२०५७८०४०

# मस्साजोग खून प्रकरणी कडक कारवाई करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची मागणी ; पवनचक्की प्रकरणी बीडच्या आमदारांचीही चौकशी व्हावी

बीड (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी. यात कुणीही राजकारण करू नये. तसेच, बीड मतदारसंघातील पवनचक्की प्रकरणी बीडच्या आमदारांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचे मूळ कारण पवनचक्की ठरली. याप्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांनी राजकारण करू नये. आरोपींवर कडक कारवाई करावी,



अशी आपली स्पष्ट भूमिका आहे. मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे, यात स्थानिक आमदारांचे आर्थिक हितसंबंध देखील आहेत. त्यांच्या वरदहस्तामुळे अनेक शेतकऱ्यांना त्रास होत आहे. याबाबत आपण अनेकदा आवाज उठविलेला असून बीडच्या आमदारांसह पवनचक्की कंपनीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करण्याची गरज आहे. या साखळीमुळे बीड मतदारसंघातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या, पिकांची हानी केली, मोबदला देण्यास टाळाटाळ होत असून शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली आहे. मस्साजोगसारखी अप्रिय घटना टाळण्यासाठी शासनाने बीडच्या आमदारांसह मतदारसंघातील पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करून दोषीविरोधात कारवाई करावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

# सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणी मुख्य आरोपीसह सर्व आरोपी तात्काळ अटक करा

## शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

मस्साजोग ।प्रतिनिधी

ता.केज.येथील सरपंच संतोष देशमुख यांचा अपहरण करून दिवसा ढवळ्या निर्दयी खून केला...ही घटना अत्यंत क्लेशदायक असून आशा घटनेने सर्व सामान्य जनतेमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण होऊ पाहत आहे.... लोकशाही आणि कायद्याच्या राज्यामध्ये अशाप्रकारे दिवसा ढवळ्या खून होत असतील तर या राज्यामध्ये कायदा सुव्यवस्था आहे का नाही हा सर्व सामान्यांना प्रश्न पडतो.. बीड मध्ये आशा प्रकारच्या घटना घडत असून बीडचा बिहार होतोय का असा प्रश्न निर्माण होत आहे... अपहरण झाल्याबरोबर स्थानिक पोलीस स्टेशनला तात्काळ माहिती देऊन सुध्दा पोलिस कारवाई करु शकले नाही.अपहरण केल्याबरोबर पोलिस घटनास्थळी पोहचले आसते तर कदाचित संतोष देशमुख यांचा जीव वाचला असता परंतु या घटनेमागे कोणाचा तरी हात आहे का,या घटनेतील मारेकऱ्यांना कोणाचेतरी पाठबळ असल्याशिवाय या गुंडाची एवढी हिम्मत होऊ शकत नाही या राज्याचे सत्ताधारी यांचे या गुंडांना अभय आहे का हा प्रश्न निर्माण होत आहे...घटना होऊन ४८ घंटे झाले तरी पोलिस आरोपींना अटक करू शकले नाही हे सुद्धा शंकास्पद आहे..या घटनेतील मारेकऱ्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे..यांच्यावर एस.आय.टी.नेमून घटनेची कसून चौकशी केली पाहिजे..या मारेकऱ्यांच्या पाठीशी कोण आहे त्याचेही फोन लरश्रश्र डिटेल्स चेक करून त्याला सह आरोपी केले पाहिजे..ज्या पोलिस अधिकाऱ्यांनी या घटनेकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केले आशाही पोलिस अधीकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली पाहिजे..



बीड जिल्हा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आम्ही संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन जिल्हा प्रशासन जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांची भेट घेऊन आरोपींना तात्काळ अटक करुन कसून चौकशी करण्याची मागणी करत आहोत.. त्याचप्रमाणे वरिष्ठांच्या कानावर टाकून बीड जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था बाबत प्रश्न उपस्थित करून या घटनेची एस.आयटी.स्थापन करून चौकशीची मागणी केली जाईल..!!



# सरपंच खून प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करा

## शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर

सरपंच संतोष कदम खून प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व आजिनाथ भाऊ खेडकर यांनी केली आहे मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून दिवसाढवळ्या निर्दयी खून केला ही घटना अत्यंत क्लेशदायक असून अशा घटनेने सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे लोकशाही आणि कायद्याच्या राज्यात अशा प्रकारे दिवसाढवळ्या खून होत असतील तर कायदा सुव्यवस्था आहे का असा प्रश्न पडतो बीडमध्ये अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडत असून देखील बिहार होतोय का काय असा प्रश्न निर्माण होत आहे अपहरण झाल्याबरोबर स्थानिक पोलीस ठाण्यात तात्काळ माहिती देऊन सुद्धा पोलीस कारवाई करू शकले नाही अपहरण केल्याबरोबर घटनास्थळी पोहोचले असते तर कदाचित संतोष देशमुख यांचा जीव वाचला असता मात्र या घटनेमागे कोणाचातरी हात आहे का या घटनेतील मारेकऱ्यांना कोणाच्यातरी पाठबळ असल्याशिवाय या गुंडांची एवढी हिंमत होऊ शकत नाही या राज्याचे सत्ताधारी यांचे या गुंडांना अभय आहे का हा प्रश्न निर्माण होत आहे घटना होऊन ४८ तास झाले तरी सर्व आरोपींना अटक करू शकले नाही हे सुद्धा शंकास्पद असल्याचे शिवसेनेचे ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व आजिनाथ भाऊ खेडकर यांनी म्हटले आहे तसेच तातडीने सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी यांनी केली आहे

# लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथगडावर राज्यभरातून मोठी गर्दी !

## मुंडे साहेबांचे संस्कार व विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही – पंकजाताई मुंडे

**वंचित मराठवाड्याला न्याय, सुरक्षित लोकजीवन व सर्वांचा विकास हे सूत्र घेऊन राजकारणात काम करणार**

**खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटं म्हणण्याचे मुंडे साहेबांचे आमच्यावर संस्कार !**

**बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीवर व्यक्त केली चिंता : गुन्हेगारी रोखण्याचा प्रयत्न हवा पण जिल्ह्याची बदनामी करु नका दु:खद घटनांकडे दु:ख म्हणून बघा यात राजकारण नको**

परळी वैजनाथ / प्रतिनिधी

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी आपलं अखंड आयुष्य कमळ रुजविण्यात घातलं आणि शेवटी कमळातच त्यांनी विसावा घेतला. वंचित, उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देत असताना ज्यांचा कोणी वाली नाही त्यांचा कैवारी होण्याचे काम मुंडे साहेबांनी केलं. धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी सर्वंकष राजकारण केलं, हाच संस्कार व विचार घेऊन आपण वाटचाल करत आहोत. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत मुंडे साहेबांचे संस्कार व विचार मी संपू देणार नाही असा निर्धार भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी आज गोपीनाथ गडावर बोलताना व्यक्त केला.**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गोपीनाथ गडावर आज राज्यभरातून मुंडे प्रेमींनी सकाळपासूनच दर्शनाला गर्दी केली होती. यावर्षीचा समारंभ साधेपणाने साजरा करणार असल्याचे आमदार पंकजाताई मुंडे यांनी जाहीर केले होते तथापि, गोपीनाथ गडावर लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून जनसागर उसळला होता.

दुपारी हेलीकॉप्टरने आगमन होताच आ. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांनी लोकनेत्याच्या समाधीला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मातोश्री प्रज्ञाताई मुंडे,पंकजाताई मुंडे यांचा मुलगा आर्यमन , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, आ.मोनिका राजळे, आ. मनोज कायंदे , माजी आ. भीमराव धोंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके आदींसह राज्यभरातून आलेले मान्यवर प्रमुख नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त समाधी परिसरात भजनी मंडळाच्या पथकाने उत्कृष्ट भजन सादर केले, यात स्वतः पंकजाताई मुंडे, डॉ. प्रीतमताई मुंडे काही काळ सहभागी झाल्या होत्या.

आयुष्य जनतेसाठी समर्पित

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, पालकमंत्री म्हणून पाच वर्ष मी या जिल्ह्याची प्रामाणिक सेवा केली.कधीही जात पात धर्म बघितला नाही.मुंडे साहेबांचे हेच संस्कार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे हा तुमचा- माझा -आपल्या सर्वांचा स्वाभिमान असून त्यांचे संस्कार व विचार संपू न देणं हे आपलं कर्तव्य आहे. संस्कार, विचार व सर्वांचा विकास या सूत्रावर वाटचाल करताना आपले आयुष्य



जनतेसाठी समर्पित आहे.ही वाटचाल करताना आपण कधीही डगमगणार नाही. उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही.

मुंडे साहेबांचे संस्कार व विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही

गेल्या काही दिवसापासून आपली तब्येत व्यवस्थित नाही आजारी असल्याने व डॉक्टरांनी गर्दीत जाऊ नका असं सांगितल्याने आणि सध्या दौरे व कार्यक्रम बंद आहेत परंतु माझ्यापेक्षाही जास्त तुम्ही मुंडे साहेबांवर प्रेम करतात आणि न चुकता तीन जून व बारा डिसेंबरला गोपीनाथ गडावर येता. माझा तर जन्म मुंडे साहेबांच्या पोटी झाला असल्याने मी येणार नाही असे होऊ शकत नाही मुंडे साहेबांनी दिलेले ते संस्कार आणि त्यांचे विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची विकासाकडे वाटचाल सुरू असून महाराष्ट्रातही जनतेने आपल्याला भरभरून आशीर्वाद दिले आहेत राज्यभरात सर्व ठिकाणी मी सहभाग घेतल्या आपल्याला जनतेने सत्ता दिली आहे आपल्या मराठवाड्याला न्याय मिळवून देण्याचं काम करायचं आहे. बीड जिल्ह्याचे सुरक्षित लोकजीवन व सर्वांचा विकास करण्याचा आपला सातत्याने प्रयत्न राहिला आहे आणि या सरकारच्या माध्यमातूनही एक काम करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीवर पंकजाताई मुंडे यांनी चिंता व्यक्त केली.केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्या अतिशय दुर्दैवी व संतापजनक घटना आहे.या कुटुंबीयांच्या दु:खात मी सहभागी आहे. याबाबत मी मुख्यमंत्र्यासह संबंधितांना बोलले आहे. त्याचबरोबर परळीतील अमोल विकासराव डुबे यांचे अपहरण करून लूटमार करण्यात आली.या दोन्ही घटनेतील दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे .या घटनांबद्दल मी प्रचंड संताप व्यक्त करते.बीड जिल्ह्यात अशी गुन्हेगारी चालू देणार नाही. गुन्हेगारी रोखण्याचा प्रयत्न हवा पण जिल्ह्याची बदनामी करु नका.दुःखद घटनांकडे दुःख म्हणून बघा यात राजकारण नको असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. दरम्यान, मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी संध्याकाळपर्यंत रांग लागली होती. यावेळी आयोजित महाप्रसादाचा हजारो लोकांनी लाभ घेतला.

# मस्साजोग खून प्रकरणी कडक कारवाई करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची मागणी ; पवनचक्की प्रकरणी बीडच्या आमदारांचीही चौकशी व्हावी

बीड (प्रतिनिधी)

**केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी. यात कुणीही राजकारण करू नये. तसेच, बीड मतदारसंघातील पवनचक्की प्रकरणी बीडच्या आमदारांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.**

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचे मूळ कारण पवनचक्की ठरली. याप्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांनी राजकारण करू नये. आरोपींवर कडक कारवाई करावी, अशी आपली स्पष्ट भूमिका आहे. मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात



पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे, यात स्थानिक आमदारांचे आर्थिक हितसंबंध देखील आहेत. त्यांच्या वरदहस्तामुळे अनेक शेतकऱ्यांना त्रास होत आहे. याबाबत आपण अनेकदा आवाज उठविलेला असून बीडच्या आमदारांसह पवनचक्की कंपनीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करण्याची गरज आहे. या साखळीमुळे बीड मतदारसंघातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या, पिकांची हानी केली, मोबदला देण्यास टाळाटाळ होत असून शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली आहे. मस्साजोगसारखी अप्रिय घटना टाळण्यासाठी शासनाने बीडच्या आमदारांसह मतदारसंघातील पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करून दोषीविरोधात कारवाई करावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा यांचे धडाकेबाज कामगिरी

बीड /प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांनी वडवणी येथील खाजगी गोडाऊन मधील सोयाबीनचे कट्टयाची घरफोडी करी करणारी टोळी निष्पन्न करुन ०२ आरोपी केले जेरबंद करुन १७ क्विंटल सोयाबीन केले जप्त

मा.पोलीस अधीक्षक साहेब, बीड यांनी घरफोडीचे मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून श्री. उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी घरफोडी करणारे आरोपींची गोपनिय माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन केले आहे.

श्री.राजेंद्र हनुमंद माळी, व्यवसाय शेती, रा.गोपळनगर वडवणी यांनी फिर्याद दिली की, दिनांक २६/११/२०२४ रोजी दुपारी ०४०० वा ते दि.२८/११/२०२४ वा चे दुपारी ०४०० वा. चे दरम्यान विनय नहार यांचे किरायाने केलेल्या गोडाऊन मध्ये ठेवलेले ३४ कट्टे एकुण २४ क्विंटल एकुण ९९६००/- रु चा सोयाबीनचा मुद्देमाल अज्ञात आरोपीतांनी गोडाऊनचे शेटरचे कुलूप तोडुन चोरुन नेले होते त्यावरुन पो.स्टे. वडवणी येथे गुरनं ३१५/२०२४ कलम ३३१(४),३०५(अ) भान्यासं प्रमाणे पो.स्टे.वडवणी येथे दिनांक २९/११/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना दिनांक ११/१२/२०२४ रोजी स्था.गु.शा.बीड येथील पोउपनि सुशांत सुतळे यांना गोपनिय बातमी मिळाली की, विनय नहार यांचे किरायाने केलेल्या गोडावुन मधील सोयाबीने कट्टे मौजे पांगरी ता.परळी येथील एक गोडावुन मध्ये विक्रीसाठी ठेवलेले असुन सोयाबीनेचे कट्टे हे माखनसिंग शेरसिंग टाक व त्याचे सोबतचे साथीदार यांनी मिळुन चोरले आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यावरुन सदर खबर पोनि श्री. उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी पुढील कार्यवाही करुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांचे पथकासह तात्काळ पाचारण होवुन माखनसिंग




टाक याचा शोध घेवुन ताब्यात घेतले व त्यास गुन्हयाअनुषंगाने चौकशी केली असता त्याने त्याचे इतर सोबतचे साथीदार मोहन तुपसमुद्रे रा. पांगरी ता.परळी, जि.बीड व इतर तीन आरोपी (फरार) अशा एकुण ०५ जनांनी मिळुन चोरी केलेली असल्याचे सांगितले. सदर आरोपींचे ताब्यातुन सोयाबीनचे ३४ कट्टे वजनी १७ क्विंटल कि.७०५५०/- व गुन्हयात वापरलेली अशोक लिलॅन्ड पिकअप जप्त करण्यात आले आहे.

दोन आरोपी व सोयाबीनचे ३४ कट्टे पो.स्टे.वडवणी यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन उर्वरित तीन आरोपींचा शोध चालु आहे. सदर आरोपीतांकडुन आणिखीन इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोह/ मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, राजु पठाण, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह वडमारे यांनी मिळुन केलेली आहे.

# हिवरसिंगा ची शाळा भौतीक सुविधायुक्त व सुसज्ज होणार

शिरुर (प्रतिनिधी)

हिवरसिंगा केंद्रिय प्राथमिक शाळा हिवरसिंगा ता.शिरूर येथील शाळेतील विविध भौतिक सुविधांचे नियोजन करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.यामध्ये श्री.विश्वाभंर शिंदे (उपसरपंच) श्री.माऊली शिंदे,श्री.भिमराव सानप,श्री.विनोद टाकसाळ (अध्यक्ष.शा.व्य.स.), श्री.राजू सानप (उपाध्यक्ष) श्री.शिवराम राऊत( संपादक साप्ता.एज्युकेशन रिपोर्टर्स) .शाम दुधाळ(पालक सदस्य), सिध्देश्वर दुधाळ (पालक) श्री.कंठाळे सर, व्ही.के.मिसाळ सर.गौतम औसरमल (उपसंपादक दै.प्रजापत्र) उपस्थिती होती.या बैठकित निजामकालीन मोडकळीस आलेल्या शाळा पुनर्बांधणी योजना अंतर्गत दोन वर्ग खोल्या मंजुर आहेत त्यांचे बांधकाम करणे,तसेच



शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या बैठकित विविध सुविधा करण्याचे नियोजन

ग्रामपंचायत हिवरसिंगा यांच्या माध्यमातून स्वच्छतागृह बांधकाम करणे,शाळेच्या आवारातील पाणीपुरवठा जलकुंभ डागडुजी करणे, शाळेतील संरक्षण भिंत, क्रिडा साहित्य उपलब्धता, परिपाठासाठी लाऊड स्पिकर, परिपाठ मैदानात प्लेवरब्लाक बसवणे,शालेय पोषण आहार किचन दुरूस्ती,विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी, प्रयोगशाळेसाठी स्वतंत्र कक्ष मागणी करणे,संगणक मागणी व कक्ष उभारणे, परसबाग तयार करणे.अशा विविध भौतिक सुविधा करण्याचे नियोजन करण्यात आले.यासाठी राज्यशासनाच्या राजमाता जिजाऊ वर्गबांधनी योजना,सह ग्रामपंचायत हिवरसिंगा, शासनाच्या विविध योजना अंतर्गत सहभागी होऊन विद्यार्थी विकासा साठी आवश्यक आसणा-या भौतिक, शैक्षणिक, व शारिरिक क्षमता विकासाच्या उपाय योजना करण्याचे त्यासाठी सर्वांनी एकदिलाने शासनाकडून निधी प्राप्त करून जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेच्या सर्व भौतिक सुविधा युक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी जेष्ठ नागरिक श्री.प्रल्हाद भाऊ सानप. श्री.रामेश्वर पांडुळे,श्री.गवळी गणेश, गावकरी सह श्री.घोरड सर,दत्तात्रय दुधाळ सर,श्री.संदीप कदम सर, चि.मयुर शिंदे सर,श्रीम.मिसाळ मॅडम,श्रीम.बोडखे मॅडम, श्रीम.जेधे मॅडम,मुकिंद वाकळे,नामदेव वाकळे,राजू गायकवाड, व ग्रामस्थ,पालक व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत होती.

# स्व.पोलीस हेडकॉन्स्टेबल भारत अंबादासराव शिंदे पा.यांच्या जयंतीनिमित्त संस्कृती विद्यालयात शालेय साहित्य आणि फळ वाटप

बीड येथील प्रसिद्ध उद्योजक जय भवानी ग्रुप ऑफ महाराष्ट्र चे सर्वेसर्वा श्री.रुपेश भैय्या शिंदे यांनी त्यांचे वडील स्व.भारत अंबादासराव शिंदे पा.पोलीस हेडकॉन्स्टेबल बीड येथे यांच्या ५६ व्या जयंतीनिमित्त संस्कृती विद्यालयात ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप केले श्री.रुपेशजी शिंदे सरांची ही कृती इतरांना मार्गदर्शक आहे,यावेळी प्रथम संस्थेचे अध्यक्ष डॉ.दत्ता नलावडे सर यांनी रुपेश भैय्या शिंदे आणि त्यांच्या सर्व मित्र परिवाराचा संस्थेच्या वतीने सत्कार केला व स्वागत केले.इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत च्या विद्यार्थ्यांना शिंदे सर यांच्यातर्फे चित्रकला साहित्य, वही,पेन,पुस्तक आणि फळे देऊन




विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यात आली व मुलांचे कौतुक करण्यात आले.सर्व विद्यार्थ्यांनी शालेय साहित्य आणि फळे व खाऊ चा आस्वाद घेतला बालगोपाळांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून मनस्वी समाधान वाटले अशी प्रतिक्रिया श्री.शिंदे सरांनी यावेळी व्यक्त केली. यावेळेस उपस्थित रुपेश भैय्या शिंदे यांचा मित्रपरिवार टेनिस कोच अतिक शेख सर, समाजसेवक अक्षय साखरे,वैभव जाधव, स्वप्निल शेळके ,सौरभ निंबाळकर,आसेफ पठाण,प्रवीण थोरात,रवी शेंदाडे, उपस्थित होते,शेवटी डॉ. दत्ता नलावडे सर यांनी शिंदे सरांचे आभार मानले दरवर्षी जयंतीनिमित्त शिंदे सर संस्कृती विद्यालय येथे मुलांना अशा प्रकारे मदत करत असतात त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT